**हवामान अनुकूल कृषी प्रकल्पांतर्गत (PoCRA), मराठवाडा व विदर्भातील ४००० गावांची निवड करण्याकरीता समिती स्थापन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : हअप्र-०७१६/प्र. क्र. ८२/राकृवियो कक्ष,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ ऑक्टोबर, २०१६.

**वाचा :**

१. शासन निर्णय क्रमांक:- हअप्र-०७१६/प्र. क्र.८२/राकृवियो कक्ष, दि.७/०७/२०१६
२. शासन निर्णय क्रमांक:- हअप्र-०७१६/प्र. क्र.८२/राकृवियो कक्ष, दि.१०/०८/२०१६
३. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. ३०/०८/२०१६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त-शासन पत्र क्र. राकृवि-०६१६/प्र.क्र.७८/राकृवियो कक्ष, दि. २०/०९/२०१६.

**प्रस्तावना:-**

विदर्भ व मराठवाडयातील सुमारे ४००० दुष्काळामुळे बाधित झालेल्या गावांमध्ये तसेच विदर्भातील पूर्णा नदीच्या खोऱ्यातील खारपाण पट्टयातील सुमारे ९०० गावांमध्ये ६ वर्ष कालावधीत जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने सुमारे रू. ४००० कोटी अंदाजित खर्चाचा हवामान अनुकूल कृषी प्रकल्प (Project on Climate Resilient Agriculture) राबविण्यास संदर्भांकित दि.७/०७/२०१६ च्या शासन निर्णयान्वये तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, संदर्भांकित शासन निर्णय दि.१०/०८/२०१६ अन्वये प्रकल्प अंमलबजावणी कृती आराखडा तयार करणे व या प्रकल्पाच्या अंमलबजावणी करीता मुंबई येथे प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (Project Management Unit) स्थापन करुन या कक्षाकरीता आवश्यक २३ पदांच्या निर्मितीस शासनाने मान्यता प्रदान केली आहे.

या प्रकल्पांतर्गत ४००० गावातील शेती दुष्काळापासून सुरक्षित करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येणार आहेत. हवामान अनुकूल कृषी प्रकल्पाची मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.३० ऑगस्ट, २०१६ रोजी आढावा बैठक घेण्यात आली, या बैठकीत प्रकल्प क्षेत्रातील दुष्काळामुळे सर्वाधिक बाधित झालेल्या सुमारे ४००० गावांची निवड करण्याकरीता प्रधान सचिव (कृषी) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुषंगाने शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

१. हवामान अनुकूल कृषी प्रकल्पांतर्गत ४००० गावांतील शेती दुष्काळापासून सुरक्षित करण्याकरिता पाणलोट क्षेत्र विकास आधारीत विविध उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. त्यानुषंगाने पाणलोट क्षेत्राशी सुसंगत

असणाऱ्या व दुष्काळामुळे प्रकल्प क्षेत्रातील सर्वाधिक बाधित ४००० गावांच्या निवडीकरिता पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे -

| अ.क्र. | नांव / पदनाम | समितीचे पद |
|---|---|---|
| १ | प्रधान सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई | अध्यक्ष |
| २ | श्री. रणधीर सावरकर, वि.स.स., अकोला पूर्व | सदस्य |
| ३ | प्रकल्प संचालक, हवामान अनुकूल कृषी प्रकल्प, मुंबई | सदस्य-सचिव |
| ४ | कुलगुरू, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी | सदस्य |
| ५ | कुलगुरू, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला | सदस्य |
| ६ | आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, पुणे | सदस्य |
| ७ | महासंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे | सदस्य |

२. उपरोक्त गठीत समितीच्या बैठकांमध्ये आवश्यकतेनुसार इतर शासकीय/ अशासकीय संस्थांमधील तज्ज्ञांना वेळोवेळी चर्चेकरिता निमंत्रित करता येईल.

३. सदर समितीने निवडावयाच्या ४००० गावांपैकी ३००० गावे मराठवाडयातील ८ जिल्हयांतून सर्वाधिक व १००० गावे विदर्भातील ६ जिल्हयांमधून (अमरावती विभागातील ५ जिल्हे व वर्धा जिल्हा) निवडावयाची आहेत.

४. विदर्भातील पुर्णा नदीच्या खोऱ्यातील (अमरावती, अकोला व बुलढाणा जिल्यातील) खारपाण पट्ट्यातील ८९४ गावे यापूर्वीच उच्च स्तरीय समितीने निश्चित केलेली आहेत. सबब, जळगांव जिल्हयातील मुक्ताईनगर तालुक्यातील खारपाण पट्ट्याच्या समस्यांनी बाधित गावांची निवड उक्त समितीने करावी.

५. गावांची निवड करण्याकरीता प्रकल्प क्षेत्रातील “हवामान, कृषी व सामाजिक स्थितीबाबत” समितीने सुयोग्य निर्देशक (Indicators) निवडावेत. या निर्देशकांना उचित गुणांक देऊन उपलब्ध माहितीचे शास्त्रोक्त विश्लेषण करुन समितीने प्रकल्प क्षेत्रातील सर्वाधिक बाधित गावांची क्रमवारी निश्चित करावी. सदर गावांपैकी सर्वाधिक ४००० बाधित गावांची निवड करतेवेळी पाणलोट क्षेत्राशी सुसंगत असणाऱ्या गावांचा समूह गट (Cluster basis) तयार करता येऊ शकेल अशा गावांची प्राधान्याने निवड करावी.

६. समितीने निवड केलेल्या गावांचा पाणलोट क्षेत्राशी सुसंगत समूहगट (Cluster) तयार करावा जेणेकरुन प्रकल्पांतर्गत पाणलोट क्षेत्राच्या विकासाच्या अनुषंगाने उपाय योजना करणे सुलभ होईल.

७. सदर समितीने शास्त्रोक्त विश्लेषणाच्या आधारे प्रकल्प क्षेत्रांतर्गत दुष्काळापासून सुरक्षित करावयाच्या ४००० गावांचा आणि मुक्ताईनगर तालुक्यातील खारपाण पट्टयाच्या समस्यांनी बाधित गावांच्या निवडीचा प्रस्ताव अंतीमत: शासनाच्या मंजूरीस्तव सादर करावा.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१०२८१४४५०८४३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2016.10.28 14:48:41 +05'30'

**(श्रीकांत चं. आंडगे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
२. मा. मंत्री (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
३. मा.विरोधी पक्षनेता विधानसभा/विधानपरिषद,विधानभवन,मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व संसद सदस्य/महाराष्ट्र विधानसभा सदस्य /महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य
६. श्री. रणधीर सावरकर, मा. वि.स.स., अकोला पूर्व
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
८. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०.प्रधान सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. प्रधान सचिव (सेवा),सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई.
१२.प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय, मुंबई.
१३.कुलगुरू, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी
१४.कुलगुरू, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
१५. आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, पुणे,
१६. प्रकल्प संचालक,हवामान अनुकूल कृषी प्रकल्प,मुंबई.
१७.महासंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे
१८. उप सचिव (सर्व),कृषी व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई.

१९. विभागीय आयुक्त (औरंगाबाद / नाशिक/  अमरावती / नागपूर विभाग)

२०. जिल्हाधिकारी (सर्व)

२१. विभागीय कृषी सहसंचालक (सर्व)

२२. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (सर्व)

२३.महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर,

२४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

२५. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,

२६. वित्त विभाग (व्यय १ / विसु  १), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,

२७. नियोजन विभाग ( कार्यासन १४३१), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,

२८. कक्ष अधिकारी, कार्यासन क्रमांक - २अे  कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.

२९. निवड नस्ती.